# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (0721) 257 7913


**कालमर्यादीत** क्रमांक :-विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१७/ 1152

ईमेलव्दारे/संकेतस्थळावर दिनांक 12 MAY 2017

**प्रति,**

**प्राचार्य,**

सर्व अनुदानित/विना-अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदविका/ पदवी संस्था

सर्व शासकीय/अनुदानित/विना-अनुदानित एम.बी.ए. / एम.सी.ए. पदव्युत्तर पदवी संस्था

**विषय :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना संस्थेचे शिक्षण शुल्क ऑनलाईन अप्रुव्हल करुन घेण्याबाबत.**

**संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्रमांक:विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१७/९६७,दि.२०/०४/२०१७**

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतीपुर्ती योजनेचे ऑनलाईन अर्ज भरण्यात आलेले आहे. तेव्हा आपल्या संस्थेतील आर्थिकदृष्टया मागास वर्गीय प्रतिपुर्तीकरीता अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची त्यांच्या प्रवेशीत वर्षानुसार शिक्षण शुल्क समितीने मंजूर केलेल्या फी स्ट्रक्चरची प्रती व Candidate List to be Submitted to RO चा रिपोर्टसह या कार्यालयात संदर्भाकिंत पत्रानुसार दिलेल्या दिनांकास प्रत्यक्ष उपस्थित राहून ऑन-लाईन न चुकता अप्रुव्हल करुन घेण्यास कळविण्यात आले होते.

परंतू अद्याप काही संस्थानी या कार्यालयाव्दारे संस्थेचे शिक्षण शुल्क समीतीने मंजूर केलेले शिक्षण शुल्क अप्रुव्हल केले नाही. त्या संस्थांना शेवटची संधी म्हणुन दिनांक १५/०५/२०१७ पर्यंत नचुकता या कार्यालयास सादर करावी. जर फी मंजुर झाली नसल्यास आपल्या संस्थेची शैक्षणीक वर्ष २०१५-१६ ची शिक्षण शुल्क समितीने मंजूर केलेले शिक्षण शुल्क शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता ग्राह धरावयाचे असल्याचे त्याबाबतचे लेखी पत्र या कार्यालयास तात्काळ सादर करावे. अन्यथा आपल्या संस्थेची ईबीसी प्रतिपूर्तीची रक्कम मंजूर केली जाणार नाही.

सदर कार्यवाही ही कालमर्यादेतच करावयाची असल्यामुळे आपल्या संस्थेचा निर्णय उलटटपाली कळविण्याची दक्षता घ्यावी.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत:-** प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना ईमेलव्दारे/ संकेतस्थळावर टाकण्याकरीता.